# आकाशवाणी नागपूर,
# (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
# रविवार दिनांक २० जुलै २०२५

ठळक बातम्या

1. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सरकारचं सर्वपक्षीय बैठकीत आवाहन.
2. आईसीएमआरने विकसित केली मलेरियावरील स्वदेशी लस.
3. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार जाहीर.

आणि

4. नागपूर मधील अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांसाठी 22 जुलै रोजी "तक्रार निवारण जन सुनावणी परिषदेचे आयोजन.

.......

लोकसभा पावसाळी अधिवेशन

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने नवी दिल्लीत संसद भवन इथं सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. सर्वपक्षीय बैठकीत सर्व पक्षाच्या नेत्यांनी आपापल्या भूमिका तसंच अधिवेशनात मांडू इच्छिणाऱ्या मुद्द्यांची चर्चा केली असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सहकार्य करण्याची विरोधी पक्षांना सरकारने विनंती केली आहे, सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांशी समन्वय साधून काम करावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अधिवेशनात नियम आणि परंपरेचं पालन करत सर्व विषयांवर चर्चा होईल, असं रिजिजू यांनी स्पष्ट केलं.

*हमने ये रिक्वेस्ट किया है कि सदन अच्छा सा चले के लिए पक्ष और विपक्ष मिल करके हमको काम करना होगा। आपस में कॉर्डिनेशन अच्छी तरह से रखना होगा। हम पोलिटिकल पार्टीस अलग-अलग विचारधारा का हो सकता है। मगर पार्लियामेंट का सदन अच्छी तरह से चले, यह सबका जिम्मेदारी है। अपोजिशन का भी जिम्मेदारी है और सरकार का भी जिम्मेदारी है।*

अधिवेशनात प्रधानमंत्र्यांनी संसदेत महत्त्वाच्या विषयांवर निवेदन द्यावं अशी मागणी काँग्रेसने या बैठकीत केल्याचं गौरव गोगोई यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

*क्योंकि जो बयान आज अमेरिका के राष्ट्रपति से आ रहे हैं वो कहीं ना कहीं भारत की गरिमा, भारत की सेना की शौर्य पर सवाल उठाता है और अमेरिका के राष्ट्रपति के उत्तर कोई मंत्री नहीं, कोई विशेष सूत्र नहीं, कोई प्रेस रिलीज नहीं, सिर्फ भारत के प्रधानमंत्री ही दे सकते हैं।*

ऑपरेशन सिंदूर दरम्यान ५ विमानं पाडली गेल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावर आणि पहलगाममधल्या सुरक्षेतल्या त्रुटीवर बोलावं, अशी मागणी काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने सरकारला केली आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या २१ बैठका होतील. या अधिवेशनात जनविश्वास सुधारणा विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सभागृहात चर्चेला येण्याची शक्यता आहे.

मलेरिया स्वदेशी लस

मलेरिया निर्मूलनातील प्रयत्नात पहिली स्वदेशी लस तयार करण्यात भारताला मोठं यश मिळालं आहे. या लसीच्या उत्पादनासंदर्भात लवकरच खासगी कंपनीसोबत करार केला जाणार असल्याचं भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद–ICMR नं म्हटलं आहे. ऑक्सफर्ड आणि जागतिक आरोग्य संघटनेने तयार केलेल्या लसीपेक्षा ही लस प्रभावी असल्याचं (ICMR) आयसीएमआरनं म्हटलं आहे.

राज्याचे कृषिमंत्री कोकाटे

राज्याचे कृषिमंत्री ॲड माणिकराव कोकाटे हे विधिमंडळामध्ये मोबाईलवर रमी हा पत्त्यांचा खेळ खेळत असल्याचा व्हिडिओ रोहित पवार यांनी समाज माध्यमांवर व्हायरल केला आहे. त्यावर राजकीय टीका होत असताना, आज नाशिकमध्ये कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी या आरोपाचे खंडन केले आहे. आपण मोबाईल सुरू केल्यानंतर रमी या खेळाची जाहिरात आली होती ती स्कीप करून आपण मोबाईल बघत असतानाच शूटिंग चित्रित झालेले दिसते असे ते म्हणाले. हा इतका गंभीर विषय नाही. रोहित पवार यांनी आतापर्यंत कृषी या विषयावर कधी विधिमंडळात प्रश्नही मांडले नाही अशी टीका त्यांनी केली.

एकनाथ शिंदे-नामदेव महाराज पुरस्कार

श्री संत नामदेव महाराज फड संस्थान आणि संत वंशज, पंढरपूर यांच्या वतीनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार जाहीर झाला आहे. संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त येत्या गुरुवारी २४ जुलै रोजी पंढरपुरात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या प्रसंगी संपूर्ण राज्यभरातले संतांचे वंशज, फड परंपरेचे प्रमुख, वारकरी संप्रदायातले मान्यवर, तसंच कीर्तनकार उपस्थित राहणार आहेत.

सुनावणी परिषद

उत्तर नागपूर मधील अनुसूचित जाती व जमातीच्या नागरिकांच्या विकासासाठी शासन तत्पर असून, ज्यांच्या तक्रारी असतील त्याची थेट सुनावणी करून न्याय देण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र राज्याच्या वतीने 22 जुलै मंगळवार रोजी "तक्रार निवारण जन सुनावणी परिषद" आयोजित करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमात आयोगाचे उपाध्यक्ष व सदस्य ऍड धर्मपाल मेश्राम स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी स्वीकारणार आहेत. या परिषदेत संबंधितांनी उपस्थित रहावे असे आवाहन मेश्राम यांनी केले आहे

*इंदोरा येथील परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर ह्या ठिकाणी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या तक्रारीच्या अनुषंगाने जनसुनावणीचे आयोजन करण्यात आलेला आहे. मी नागपुर, उत्तर नागपुर विधान सभा, महाराष्ट्र राज्य, आजूबाजूच्या सर्व अनुसूचित जाती-जनजातीच्या नागरिकांना विनंती करतो, आवाहन करतो, की राज्य शासनाच्या विविध विभागातील ज्या काही त्यांच्या समस्या प्रलंबित असतील त्या समस्यांच्या त्या तक्रारीच्या निवारणाच्या अनुषंगाने आपण आपल्या लिखित अर्जासह मोठ्या प्रमाणावर दिनांक 22 जुलै च्या या जनसुनावणीमध्ये सहभागी व्हायचा आहे.*

ही परिषद सकाळी ११ ते दुपारी २ वाजता पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर, इंदोरा चौक, नागपूर येथे होईल.

पुरस्कार

नाबार्डच्या ४४ व्या स्थापना दिनानिमित्त पुण्याच्या यशदा सभागृहात पार पडलेल्या समारंभात अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला उत्कृष्ट जिल्हा बँक म्हणून गौरवण्यात आलं. अमरावती विभागातून सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या या बँकेचा सन्मान करताना उपस्थित मान्यवरांनी बँकेच्या ग्रामीण विकासातील योगदानाची स्तुती केली. या कार्यक्रमाला केंद्रिय सहकार राज्यमंत्री मुरलिधर मोहोळ, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा पुरस्कार बँकेचे सहायक व्यवस्थापक प्रसन्नकुमार बोंथा यांनी स्वीकारला. अकोला इथं आयोजित कार्यक्रमात बँकेचे अध्यक्ष डॉ.संतोषकुमार कोरपे म्हणाले, ग्रामीण भागातील आर्थिक समावेशन आणि शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी केलेल्या कार्याची ही पावती आहे.

प्रतिनीधी सभा

संपूर्ण विश्वाच्या हिताची चिंता करत सर्वांच्या सुखाची कामना करणे हेच मूलभूत हिंदू विचारधन आहे. भारताचा गौरवशाली इतिहास आणि परंपरा ह्याच विचारांचे प्रतिबिंब आहेत," असं प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी नागपूरात केलं. समितीच्या रेशीमबाग, स्मृती मंदिर इथं अखिल भारतीय कार्यकारिणी आणि

प्रतिनिधी मंडळाच्या १७ ते २० जुलै २०२५ दरम्यान आयोजित अर्धवार्षिक बैठकीच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सन २०२६ मध्ये राष्ट्र सेविका समितीच्या स्थापनेला ९० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने प्रतिनिधी सभेत कार्यवृद्धीची योजना आखण्यात आली, तसेच हे निश्चित करण्यात आले की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमांत राष्ट्र सेविका समितीच्या सेविका पूर्ण उत्साहाने सहभागी होतील. समितीच्या विविध कार्यविभागांमार्फत संघ शताब्दीनिमित्त पुढील एक वर्षात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. प्रतिनिधी सभेत "युवकांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता – एक गंभीर संकट" या विषयावर प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या अर्धवार्षिक बैठकीस ३८ प्रांतांतील ४११ प्रतिनिधी उपस्थित होते.

चंद्रपूर मनपा

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये ३ ते १० लाख लोकसंख्येतील शहरांमध्ये चंद्रपूरने देशात २१ वा क्रमांक मिळवला असून, ‘३ स्टार सिटी’चा बहुमानही पटकावला आहे. महानगरपालिकेच्या अहवालानुसार, डोअर टू डोअर कचरा संकलन ९३% यशस्वीपणे राबवण्यात येत आहे, तर ७६% नागरिक ओला आणि सुका कचरा वेगळा करत आहेत. संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते आणि शहराने ODF++ दर्जाही कायम राखला आहे. मागील वर्षी ४८व्या क्रमांकावर असलेल्या शहराने यंदा नागरिकांचा सहभाग, कचरा प्रक्रिया केंद्रांची गुणवत्ता आणि प्रभावी व्यवस्थापनामुळे २१वा क्रमांक मिळवला आहे. “सीवरेज प्रकल्प पूर्ण झाल्यावर चंद्रपूर देशातील टॉप १० शहरांमध्ये निश्चित स्थान मिळवेल,” असा विश्वास आयुक्त विपीन पालीवाल यांनी व्यक्त केला आहे.

छगन भुजबळ

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत सध्यातरी कोणताही विचार नाही, असं राज्याचे अन्न आणि पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते आज सकाळी नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. सध्या असा कोणाताही विचार नसल्याचं अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यापूर्वीच स्पष्ट केलं आहे. राज्यात तीन पक्षांचं सरकार आहे, जर तसं काही करायचं असल्यास मित्र पक्षांचा सल्ला घेणं, त्यांना विश्वासात घेणं आणि भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करण्याचा घेतलेला निर्णय योग्यच असल्याचं भुजबळ म्हणाले.

हवामान

आज पूर्व विदर्भात वर्धा वगळता नागपूर भंडारा, गोंदिया तसेच पश्चिम विदर्भात यवतमाळ येथे तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे. अशाच पर्जन्यमानाची शक्यता पुढील 4 दिवस चंद्रपूर

गडचिरोली यवतमाळ येथे वर्तवण्यात आली आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे 35 पूर्णांक 2 अंश सेल्सियस करण्यात आली.

******